महापारेषण

(CIN NO. U40109MH2005SGC153646)

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

प्रेषक,
अधिक्षक अभियंता
अऊदा संवसु मंडळ, अकोला
विद्युत भवन, ३रा माळा,
रतनलाल प्लॉट, अकोला-४४४००५
फोन नं. ०७२४ – २४३४५४४ / २४३४५४५
ईमेल आयडी - se1200@mahatransco.in

जा. क्र. अअ/अऊदा/संवसु/मंडळ/अकोला/मासं/ RU - 0303 दिनांक - 07 APR 2025

**विषय :-** शिकाऊ उमेदवार कायदा १९६१ अंतर्गत सन २०२४-२५ भरती करीता अउदा संवसु मंडळ, अकोला येथे निवड झालेल्या उमेदवारांची चौथी निवड यादी.

१. उमेदवारी कायदा १९६१ च्या अंतर्गत या विभागीय कार्यालयाकडून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्ष परिषद (NCVT) मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून विजतंत्री (Apprenticeship) या व्यवसायातुन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून शासनाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज मागविण्यात आले होते.

२. त्या अनुषंगाने सक्षम निवड समितीने ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या / कागदपत्रांच्या (जात, गुण इ.) आधारे तयार करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवाराच्या तात्पुरत्या निवड यादीस मंजूरी दिली आहे. शिकाऊ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी त्यांना एस. एस. सी. व आय. टी. आय. विजतंत्री (Apprenticeship) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीनुसार तयार करण्यात आलेली आहे. तसेच सदर तात्पुरती निवड यादी अधिक्षक अभियंता, तथा निम्नस्वाक्षरीकार अउदा संवसु मंडळ, अकोला यांच्या परवानगीने प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक शिकाऊ उमेदवारांचे एकुण गुण समान आहेत अशा शिकाऊ उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील जेष्ठ उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे.

४. तात्पुरती निवड झालेल्या सर्व शिकाऊ उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात उत्पन्न, गटात मोडत नसणे इत्यादी बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्र / कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल व सादर करू न शकलेल्या शिकाऊ उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारांचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरत्या स्वरूपात असुन पुर्णत: शिकाऊ उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होणेसाठी आवश्यक असलेली पुर्वावश्यकता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तींचा भंग होत असल्यास संबंधीत उमेदवारी / निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेला शिकाऊ उमेदवार कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र आढळुण आल्यास अथवा कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास गुणवत्तेनुसार यादीतील शिकाऊ उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल.





CamScanner

७. तात्पुरती निवड यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, अकोला यांनी राखुन ठेवले आहेत.

८. निवड न झालेल्या शिकाऊ उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार अउदा संवसु मंडळ, अकोला या कार्यालयाकडे करू नये. शिकाऊ उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. निवड यादी ( Select List) मधील उमेदवारांना **दि.०९.०४.२०२५ रोजी अधिक्षक अभियंता अउदा संवसु मंडळ, अकोला विद्युत भवन, ३ रा माळा, रतनलाल प्लॉट, अकोला या पत्त्यावर सकाळी १०:०० ते ०५:०० वाजता या वेळेत हजर रहावे. दि.०९.०४.२०२५** रोजीनंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१०. कागदपत्र पडताळणीच्या वेळी खालील प्रमाणे मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्र/ सादर करणे आवश्यक असले तरी उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१. शाळा सोडल्याचा दाखला.
२. आय. टी. आय. विजतंत्री गुणपत्रक (सर्व सत्र) व प्रमाणपत्र (सनद).
३. एस. एस. सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र.
४. राखीव गटातुन उमेदवाराने अर्ज केला असेल तर जात प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमााणपत्र
५. उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
६. आर्थिक दुर्बल घटक उमेदवार मोडत असेल तर चालु अद्ययावत प्रमाणपत्र.
७. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
८. चारित्र पडताळणी प्रमाणपत्र
९. आधार कार्ड.
१०.बॅक पासबुक.

११. कागदपत्रे पडताळणी करीता येणा-या शिकाऊ उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. शिकाऊ उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित रहावे लागेल.

१२. या पत्रा सोबत निवड यादी ( Select List) जोडत आहोत.

१३. शिकाऊ उमेदवार कायदा १९६१ अंतर्गत सन २०२४-२५ भरती प्रक्रीयेचे सर्व अधिकार अधिक्षक अभियंता तथा निम्नस्वाक्षरीकार, अउदा संवसु मंडळ, अकोला यांनी राखुन ठेवले आहेत.

**सहपत्र :- चौथी निवड यादी ( Select List)**

(संजय ओं. काटकर)
अधिक्षक अभियंता,
अउदा संवसु मंडळ,अकोला



D:\Shri. Akode\HR\23-Apprenticeship\4-Apprentceship-2024-25\2-Apprenticeship 2024-25 14.01.2025.docx

CamScanner

## शिकाऊ उमेदवार कायदा १९६१ अंतर्गत सन २०२४-२५ भरती करीता अउदा संवसु मंडळ, अकोला येथे निवड झालेल्या उमेदवारांची तिसरी निवड यादी.

## चौथी निवड यादी ( Select List)

### खुला प्रवर्ग निवड यादी:-

| Sr.No. | Application Code | Candidate Name | Cast as per Certificate | Total Weightage Mark Obtained (50%Marks SSC & 50%Marks ITI ) | Selection |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AP122499545 | Bhavika Manoharrao Bhad | Open | 86.783 | Selected against-Open |
| 2 | AP1224150296 | Mohit Dnyaneshwar Charpe | Open | 86.775 | Selected against-Open |

### अजा प्रवर्ग निवड यादी:-

| Sr.No. | Application Code | Candidate Name | Cast as per Certificate | Total Weightage Mark Obtained (50%Marks SSC & 50%Marks ITI ) | Selection |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AP1224110354 | Sushil Chandramani Gopkar | SC | 85.233 | Selected against-SC |

### अज प्रवर्ग निवड यादी:-

| Sr.No. | Application Code | Candidate Name | Cast as per Certificate | Total Weightage Mark Obtained (50%Marks SSC & 50%Marks ITI ) | Selection |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AP1224131061 | Mahendra Dnyneshwar Atram | ST | 84.583 | Selected against-ST |
| 2 | AP122498123 | Vishal Babarao Thakare | ST | 83.900 | Selected against- ST |

### इमाव प्रवर्ग निवड यादी:-

| Sr.No. | Application Code | Candidate Name | Cast as per Certificate | Total Weightage Mark Obtained (50%Marks SSC & 50%Marks ITI ) | Selection |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AP1224111832 | Rushikesh Shankar Mate | OBC | 86.742 | Selected against-OBC |

### ईडब्ल्यु एस. प्रवर्ग निवड यादी:-

| Sr.No. | Application Code | Candidate Name | Cast as per Certificate | Total Weightage Mark Obtained (50%Marks SSC & 50%Marks ITI ) | Selection |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AP1224142823 | Farhan Aatif Abdul Arif | EWS | 76.525 | Selected against-EWS |

(संजय ओं. फाटकर)
अधिक्षक अभियंता,
अउदा संवसु मंडळ,अकोला

D:\Shri. Akode\HR\23-Apprenticeship\4-Apprentceship-2024-25\2-Apprenticeship 2024-25 14.01.2025.docx

CamScanner